ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

# बी.ए. (मराठी माध्यम) G01

## शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2020–2021**

# बी. ए. पदवी शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

## *अनुक्रमणिका*


१. विद्याशाखेचा परिचय ..... ४

२. शिक्षणक्रमाविषयी ..... ४

- २.१ शिक्षणक्रमाची संरचना
- २.२ अध्ययनपद्धती

३. प्रथम वर्ष बी.ए. ..... ५

- ३.१ अभ्यासक्रम
- ३.२ प्रवेश पात्रता
- ३.३ शिक्षणक्रम शुल्क
- ३.४ कालावधी
- ३.५ माध्यम
- ३.६ मूल्यमापन प्रक्रिया
- ३.७ श्रेयांक

४. द्वितीय वर्ष बी.ए. ..... ७

- ४.१ अभ्यासक्रम
- ४.२ प्रवेश पात्रता
- ४.३ शिक्षणक्रम शुल्क
- ४.४ कालावधी
- ४.५ माध्यम
- ४.६ मूल्यमापन प्रक्रिया

५. तृतीय वर्ष बी.ए. ..... १०

- ५.१ अभ्यासक्रम
- ५.२ प्रवेश पात्रता
- ५.३ शिक्षणक्रम शुल्क
- ५.४ कालावधी
- ५.५ माध्यम
- ५.६ मूल्यमापन प्रक्रिया

६. नोंदणी प्रक्रिया ..... १५

७. विभागीय केंद्रे ..... १६

८. विशेष सूचना/संपर्कासाठी ..... १७

परिशिष्टे ........................................................................................................................................ १८

परिशिष्ट १ : Online Admission Process flow for Candidate NOT having 16 Digit P.R.N.
Online Admission Process flow for Candidate who already have 16 Digit P.R.N.

परिशिष्ट २ : उमेदवार/विद्यार्थी करारनामा
Candidate/Student Agreement at the time of Admission

परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)

परिशिष्ट ५ : G.R. of Equivalency for 10th and 12th

परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

परिशिष्ट ७ : G.R. of Equivalency

परिशिष्ट ८ : Letter of Recognition from UGC

परिशिष्ट ९ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

परिशिष्ट १० : श्रेयांकांतर प्रवेशासाठी यू.जी.सी.ने मान्यता दिलेल्या विद्यापीठांची यादी

परिशिष्ट ११ : अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०२०, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : जुलै २०२०

■ **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – १०

■ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-20-21-24 (FY_SY_TY-BA)**

## १. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या विद्याशाखेत मानवनिर्मित कला, साहित्य या सर्जनशील निर्मितिव्यापाराचा आणि कुटुंबसंस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंतच्या विविध संस्थांच्या रचनांचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहास–परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांचा आशय हा मानवकेंद्री असतो. मानवी मूल्यांवर व माणसाच्या विकास–कार्यक्रमांवर भर देणारा आशय हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य आहे.

विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

१. जगभरातल्या विविध संस्कृतींचा, राष्ट्र–राज्यांच्या जडणघडणीचा, इतिहास परंपरांचा, बी.ए., एम.ए., एम. फिल. व पीएच.डी. शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश.

२. मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी मूल्ये, ग्राहकसंरक्षण, पर्यावरण रक्षणादी चळवळी, सार्क, युनो, इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांचे कार्य, स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना–दर्श, जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश आहे.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधीविचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

४. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

५. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.

६. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यावसायिक यशासाठी लागणाऱ्या पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

७. स्वयंअध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

८. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

९. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, उपग्रह सेवा व वेबमाध्यमांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सेवा अशा विविध अंगांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य.

१०. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

## २. शिक्षणक्रमाविषयी

रोजगार व्यवसायाच्या विविध संधी प्राप्त होण्याकरिता आवश्यक असणारी कौशल्ये संपादित करता यावी या हेतूने या शिक्षणक्रमाची रचना करण्यात आली आहे. तात्त्विक व उपयोजित अशा दोन्ही दृष्टीने या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी ठरावी, या हेतूने अभ्यास–विषयांची मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी बौद्धिक कौशल्ये व व्यावहारिक उपयोगातील पारंगतता यातील परस्परसंबंधाची सांगड हे या शिक्षणक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

### २.१ शिक्षणक्रमाची संरचना

बी. ए. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली.

| *वर्ष* | *अभ्यासक्रम* | *श्रेयांक* |
|---|---|---|
| प्रथम | अधिष्ठान (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| द्वितीय | सामान्य स्तर (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| तृतीय | सामान्य स्तर किंवा<br>विशेष स्तर (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| | एकूण | १०८ |

वरील तीन वर्षांच्या पदवी शिक्षणक्रमात १०८ श्रेयांकांचे अभ्यासक्रम आहेत. सर्व अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे.

**प्रथम वर्ष : अधिष्ठान अभ्यासक्रम**

साहित्य, कला, समाजशास्त्रे, विज्ञान–तंत्रज्ञान आणि अभ्यास कौशल्ये अशा विविध सहा क्षेत्रांतील महत्त्वाचे सिद्धान्त वा तत्त्वे यांचा आपल्या जीवनव्यवहाराशी असलेला संबंध लक्षात यावा, या दृष्टीने सहा पायाभूत अधिष्ठान अभ्यासक्रमांचा समावेश प्रथम वर्षात करण्यात आला आहे.

**द्वितीय वर्ष : सामान्य स्तर**

कला, साहित्य, सामाजिकशास्त्रे अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. पदवी शिक्षणक्रमात द्वितीय वर्षासाठी तीन विषय निवडावेत. यात प्रत्येक सहा श्रेयांकांचे दोन अभ्यासक्रम याप्रमाणे एकूण ६ अभ्यासक्रम आहेत.

**तृतीय वर्ष : विशेष / सामान्य स्तर**

तृतीय वर्षात विशेष स्तर निवडण्याचा पर्याय उपलब्ध आहे. विशेष स्तरावरील अभ्यासक्रमात एकाच विषयाचे सहा अभ्यासक्रम असतील. ज्यांना विशेष स्तर निवडायचा नसेल त्यांना सामान्य स्तरावरील २ विषयांचे प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण ६ अभ्यासक्रम निवडता येतील.

## २.२ अध्ययन पद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही; तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

(१) स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके.
(२) तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.
(३) अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय.
(४) आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही निवडक अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्ट कॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करावा. ही स्वयं-अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ, उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. पुस्तकात प्रत्येक पृष्ठावर दोन्ही बाजूंना मोठा समास सोडलेला असतो. या कोऱ्या जागेत विद्यार्थी ठळक मुद्दे लिहून ठेवू शकतो, त्याला येणाऱ्या शंकांची नोंद करून ठेवू शकतो. अभ्यासविषयाची आवृत्ती करताना या नोंदींची व टिपणांची त्याला मदत होते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्याने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकत नाहीत तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (समंत्रक – Counsellor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात.

विद्यार्थ्याला आपल्या सोईच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी वा कार्यालयीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे, अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमांतून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

# ३. प्रथम वर्ष बी. ए.

## ३.१ अभ्यासक्रम

एकूण ३६ श्रेयांकांचे पुढील ६ अभ्यासक्रम आहेत. प्रत्येक अभ्यासक्रम ६ श्रेयाकांचा असून हे सर्व अभ्यासक्रम सक्तीचे (अनिवार्य) आहेत.

| क्र. | अभ्यासक्रम | एकूण संपर्कसत्रे |
|---|---|---|
| (१) | स्वयं-अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN 101) | ०६ |
| (२) | मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MAR 102) | ०९ |
| (३) | हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HEN101) | ०९ |
| (४) | सामान्य ज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (GKN 101) | ०९ |
| (५) | सामाजिक शास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (SOC 101) | १० |
| (६) | मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HUM 101) | ११ |

**टीप : HEN 101 मध्ये हिंदीसाठी ४ व इंग्रजीसाठी ५ संपर्कसत्रे आहेत.**

वरील प्रत्येक अभ्यासक्रमातील घटकांचा तपशील पुढीलप्रमाणे :

**स्वयं-अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (OPN101)

पुस्तक १ : वाचन व लेखन कौशल्ये
पुस्तक २ : संभाषण व श्रवण कौशल्ये
पुस्तक ३ : निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयंनिर्देशित अध्ययन

**मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (MAR 102)

पुस्तक १ : भाषिक विनिमय : तत्त्व आणि व्यवहार
पुस्तक २ : मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका
पुस्तक ३ : भाषिक सर्जनशीलता : स्वरूप आणि प्रकार
पुस्तक ४ : मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका

**हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (HEN 101)

पुस्तक १ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना
पुस्तक २ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना : कार्यपुस्तिका
पुस्तक ३ : Foundation Course in English
पुस्तक ४ : Foundation Course in English : Work Book

**सामान्य ज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (GKN 101)

पुस्तक १ : विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य
पुस्तक २ : विकास : संकल्पना आणि मार्ग
पुस्तक ३ : संज्ञापन क्रांती आणि जैवतंत्रज्ञान

**सामाजिकशास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (SOC 101)

पुस्तक १ : इतिहास व राज्यशास्त्र
पुस्तक २ : समाजशास्त्र व मानसशास्त्र
पुस्तक ३ : संज्ञापन क्रांती आणि जैवतंत्रज्ञान

**मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम** (HUM 101)

पुस्तक १ : मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय

पुस्तक २ : प्रयोगाधिष्ठित व यंत्राधिष्ठित कला

पुस्तक ३ : कार्यपुस्तिका

टीप : **पदवी श्रेणी द्वितीय व तृतीय वर्षाच्या गुणांवर दिली जाईल.**

## ३.२ प्रवेश पात्रता

वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या आणि खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती :

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठ पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण असावा.

(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी.) किंवा इतर राज्यांतील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.

(३) १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (११ वी) उत्तीर्ण.

(४) एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान २ वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका/प्रमाणपत्र शिक्षणक्रम उत्तीर्ण. उदाहरणार्थ, डी.सी.ई, डी.एम.ई., डी.ई.ई., डी.फार्म, डेअरी टेक., टी.डी., ए.टी.डी., एन.सी.टी.व्ही.टी., आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी.

(५) डी.टी.एड. पदविकेच्या द्वितीय वर्षाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

(६) य. च. म. मुक्त विद्यापीठाचा स्वयं–साहाय्य गट प्रेरक–प्रेरिका शिक्षणक्रम उत्तीर्ण असणारे विद्यार्थी.
विद्वत परिषद सभा ठराव क्र. बी१००/०५/४१ (बी – १/एफ–१७३/२००५/६३) दि. २४/२/०५.

### विशेष सूचना

(१) प्रवेश–अर्जासोबत खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

(अ) शाळा सोडल्याची दाखल्याची प्रत.

(आ) शैक्षणिक पात्रतेबाबतच्या गुण–पत्रकांच्या प्रती.

## ३.३ शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष बी.ए.)

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. ११००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. ५००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु. १६००=००** |

### शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

- ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थ्यांनी प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क रु. १,१००/– इंटरनेट बँकिंग, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईलबँकींग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.
- प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क रु. ५००/– मात्र अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यासकेंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.
- अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

**सूचना** :

(१) प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत फक्त परीक्षा–प्रवेश पत्र (Hall Ticket) व परीक्षेविषयीचे सूचनापत्र परीक्षेपूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. **त्यांनी परीक्षा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. मात्र पुनर्परीक्षार्थींसाठी नियमाप्रमाणे परीक्षा अर्ज व शुल्क भरावे लागेल.**

## ३.४ कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करताकरता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन–कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोईने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून बी.ए. पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोईने आठ वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला देण्यात आली आहे. वर्षअखेरीस होणारी परीक्षा अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास त्याच वेळी देण्याची सक्ती नाही, तसेच वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोईने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. समजा आपण प्रथम किंवा द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा दिली परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे ४०% गुण) तरी आपणांस द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र परीक्षा विभागाच्या नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरता येईल व परीक्षा देता येईल.

## ३.५ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी माध्यम विद्यार्थ्याने निवडलेल्या अध्ययनाच्या भाषेचे राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्य–पुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन,

गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका निवड केलेल्या भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून हिंदी माध्यमांतील बी.ए. शिक्षणक्रमास प्रवेश बंद करण्यात आलेले आहेत. मात्र सन २०१६-१७ मधील बी.ए. हिंदी माध्यमातील प्रथम आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुढील वर्गास प्रवेश घेता येईल.

## ३.६ मूल्यमापन प्रक्रिया

### अंतर्गत मूल्यमापन

- अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न असतील.
- गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत आणि ते सोडवून अभ्यासकेंद्रावर जमा करावेत.

  प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गृहपाठासाठी प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न सोडवावयाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यायचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (CA) दर्शविण्यात येतील. तसेच हे गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांत मिसळून गुणपत्रिकेत एकत्रितपणे दर्शविण्यात येतील.
- अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

### अंतिम मूल्यमापन

- प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक वर्षास प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती वर्ष सहा अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.

## ३.७ श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, ध्वनि-चित्रफिती ऐकणे/पाहणे, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यतः सहा श्रेयांकांचा म्हणजेच १८० ते २०० अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. पदवी परीक्षेसाठी एकूण १०८ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो. म्हणेजच पदवीधर होण्यासाठी ३ ते ८ वर्षात किमान ३२४० तासांचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे. साधारणतः अंतिम परीक्षा मे महिन्यात असेल.

# ४. द्वितीय वर्ष बी. ए.

## ४.१ अभ्यासक्रम

द्वितीय वर्षास प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी कला (B.A.) ही शाखा निवडलेली आहे. त्यासाठी सध्या उपलब्ध असणाऱ्या **विषयांची यादी.**

| | |
|---|---|
| (१) मराठी | (२) हिंदी |
| (३) इंग्रजी | (४) मानसशास्त्र |
| (५) अर्थशास्त्र | (६) राज्यशास्त्र |
| (७) इतिहास | (८) समाजशास्त्र |

**प्रत्येक विषयासाठी आपणांस दोन अभ्यासक्रमांचे अध्ययन करावयाचे आहे.** म्हणजे ३ विषयांसाठी एकूण **सहा अभ्यासक्रमांचे** प्रत्येकी सहा श्रेयांकांचे अध्ययन करून आपणांस ३६ श्रेयांकांची अंतिम परीक्षा द्यावयाची आहे. त्यासाठी खालील दोन गटामध्ये विषयांची विभागणी करण्यात आलेली असून द्वितीय वर्षासाठी अभ्यासक्रम निवडताना गटवार विभागणीनुसार तीन विषयांची निवड करावयाची आहे. एकदा निवडलेले विषय बदलता येणार नाहीत. माध्यम / विषय बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

**गट क्रमांक १ : मानव्यविद्यांचे अभ्यासक्रम**

मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांपैकी कोणतीही एकच भाषा विद्यार्थ्यांनी निवडावी.

**गट क्रमांक २ : सामाजिकशास्त्रांचे अभ्यासक्रम**

(अ) इतिहास, मानसशास्त्र

(ब) अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र

**(अ) मधील एक आणि (ब) मधील एक असे दोन विषय विद्यार्थ्याला निवडता येतील.**

### विषयनिहाय अभ्यासक्रम

**गट क्रमांक १**

| | | |
|---|---|---|
| (१) मराठी | (i) वाङ्मय प्रकार (कथा-कादंबरी) | (MAR 210) |
| | (ii) स्वातंत्र्योत्तर वाङ्मय प्रवाह | (MAR 211) |
| (२) हिंदी | (i) कथात्म साहित्य | (HIN 212) |
| | (ii) कथेतर साहित्य | (HIN 213) |
| (३) इंग्रजी | (i) How to Read a Short Story | (ENG 214) |
| | (ii) How to Read a Novel | (ENG 215) |

**गट क्रमांक २**

| | | |
|---|---|---|
| (४) मानसशास्त्र | (i) मी आणि माझे वर्तन | (PSY 216) |
| | (ii) बालसंगोपन व बालविकास | (PSY 217) |

| | | | |
|---|---|---|---|
| (५) अर्थशास्त्र | (i) | अंशलक्ष्यी अर्थशास्त्र | (ECO 218) |
| | (ii) | समग्रलक्ष्यी अर्थशास्त्र | (ECO 219) |
| (६) इतिहास | (i) | आधुनिक भारताचा इतिहास | (HIS 220) |
| | (ii) | आधुनिक जगाचा इतिहास | (HIS 221) |
| (७) राज्यशास्त्र | (i) | भारतीय राजकारणाची प्रक्रिया | (POL 224) |
| | (ii) | आपले हक्क व त्यांची परिपूर्ती | (POL 225) |
| (८) समाजशास्त्र | (i) | सामाजिक परिवर्तने व सामाजिक चळवळी | (SOC 222) |
| | (ii) | भारतीय समाज | (SOC 223) |

तसेच पर्यावरण अभ्यास (**EVS 201**) या अनिवार्य विषयाची परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागेल. या शिक्षणक्रमाचे गुण शिक्षणक्रमाचे अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात 'सी' श्रेणी मिळविणे अनिवार्य असेल.

## द्वितीय वर्ष बी.ए. : अभ्यासक्रम

■ **वाङ्मयप्रकार : कथा–कादंबरी (MAR 210)**
पुस्तक पहिलेः कादंबरी : स्वरूप आणि रचना
पुस्तक दुसरे : कथा : स्वरूप आणि रचना
पुस्तक तिसरेः कादंबरी : आकलन आणि विश्लेषण

■ **स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह (MAR 211)**
पुस्तक पहिलेः नवसाहित्य आणि नवसाहित्येत्तर साहित्य
पुस्तक दुसरे : ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य
पुस्तक तिसरेः निवडक वेचे

■ **हिंदी : कथनपर साहित्य (HIN 212)**
पुस्तक पहिलेः कथन–मीमांसा
पुस्तक दुसरे : उपन्यास विमर्ष
पुस्तक तिसरेः नाटक : स्वरूप और विश्लेषण

■ **हिंदी : कथेतर साहित्य (HIN 213)**
पुस्तक पहिलेः जीवनीपरक साहित्य
पुस्तक दुसरे : वर्णनपरक साहित्य
पुस्तक तिसरेः वैचारिक निबंध

■ **How to Read a Short Story (ENG 214)**
Book 1 : How to Read a Short Story : Book 1
Book 2 : How to Read a Short Story : Book-2
Book 3 : How to Read a Short Story : Book-3

■ **How to Read a Novel (ENG 215)**
Book 1 : How to Read a Novel

■ **मी आणि माझे वर्तन (PSY 216)**
पुस्तक पहिलेः अवधान व संवेदन आणि अध्ययन
पुस्तक दुसरे : मानवी स्मृती, विचारप्रकिया आणि व्यक्तिभेद
पुस्तक तिसरेः प्रेरणा व भावना

■ **बालसंगोपन आणि बालविकास (PSY 217)**
पुस्तक पहिलेः गर्भावस्थेपासून शालापूर्व अवस्थेपर्यंत
पुस्तक दुसरे : विकासोपयोगी उपक्रम आणि शारीरिक, भाषिक, बौद्धिक विकास
पुस्तक तिसरेः बौद्धिक, सामाजिक, भावनिक व नैतिक विकास

■ **अंशलक्ष्यी अर्थशास्त्र (ECO 218)**
पुस्तक पहिलेः अर्थशास्त्राचा अभ्यासविषय आणि अर्थव्यवस्था
पुस्तक दुसरे : मागणी, पुरवठा व बाजार
पुस्तक तिसरेः मक्तेदारी बाजार आणि विभाजन

■ **समग्रलक्ष्यी अर्थशास्त्र (ECO 219)**
पुस्तक पहिलेः समग्रलक्ष्यी अर्थशास्त्र आणि राष्ट्रीय उत्पन्न
पुस्तक दुसरे : केन्सप्रणित सिद्धांत
पुस्तक तिसरेः पैसा, पैशाचे मूल्य आणि बँकप्रणाली

■ **आधुनिक भारताचा इतिहास (HIS 220)**
पुस्तक पहिलेः ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत
पुस्तक दुसरे : राष्ट्रीय चळवळ : १८८५–१९२०
पुस्तक तिसरेः ब्रिटिश प्रशासनाचा इतिहास आणि घटनात्मक विकास (१८५८ ते १९५०)

■ **आधुनिक जगाचा इतिहास (HIS 221)**
पुस्तक पहिलेः क्रांतिपर्व : अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन राज्यक्रांती
पुस्तक दुसरे : औद्योगिक क्रांती, युरोपीय राष्ट्रवाद आणि साम्राज्यवाद
पुस्तक तिसरेः आशिया खंडातील राष्ट्रवाद : चीन आणि जपान

■ **सामाजिक परिवर्तन व सामाजिक चळवळी (SOC 222)**
पुस्तक पहिले : सामाजिक परिवर्तन : प्रक्रिया व घटक
पुस्तक दुसरे : सामाजिक परिवर्तन : परिणाम व चळवळींचा स्थूल परिचय
पुस्तक तिसरे : सामाजिक चळवळी : अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार

■ **भारतीय समाज (SOC 223)**
पुस्तक पहिलेः समाजव्यवस्था आणि कुटुंब, विवाह व नातीगोती
पुस्तक दुसरे : जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी
पुस्तक तिसरेः भारतीय खेडी आणि अर्थ व राजकारण

■ **भारतीय राजकारणाची प्रक्रिया (POL 224)**
पुस्तक पहिलेः अंतर्गत व बाह्य पर्यावरण
पुस्तक दुसरे : लोकशाहीची प्रक्रिया आणि राजकीय मानसिकता
पुस्तक तिसरेः राजकीय प्रक्रिया : संघराज्याची संस्थात्मक चौकट

■ **आपले हक्क व त्यांची परिपूर्ती (POL 225)**
पुस्तक पहिले : मूलभूत हक्क, नागरिक स्वातंत्र्ये व रोजगार हक्क
पुस्तक दुसरे : आदिवासी, शेतमजूर आणि अल्प व अत्यल्पभूधारक : हक्क आणि परिपूर्ती
पुस्तक तिसरेः वनमजूर आणि बांधकाम मजूर : हक्क आणि परिपूर्ती

■ **पर्यावरण अभ्यास (EVS 201)**

## ४.२ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती.

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

(२) १२ वी उत्तीर्णतेनंतर शासनमान्य व मान्यताप्राप्त विद्यापीठांतील बी.ए. विद्याशाखेतील प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या द्वितीय वर्षास सरळ (थेट) प्रवेश मिळेल; म्हणजेच मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या वर्षाच्या सर्व विषयांची (३६ श्रेयांकांचे ६ अभ्यासक्रम) त्यास सूट देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष उत्तीर्ण असल्याचे संबंधित विद्यापीठाच्या गुणपत्रकाची एक प्रमाणित सत्यप्रत प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **अन्यथा अंतिम प्रवेश दिला जाणार नाही.**

(३) अन्य विद्यापीठातून बी.ए. शाखेत प्रथम वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या बी.ए. शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश देण्यात येईल आणि त्याच्या अंतिम गुणपत्रिकेत सरळ (थेट) प्रथम वर्षात प्राप्त केलेल्या गुणाचा उल्लेख करण्यात येईल.

(४) अन्य शाखेतून पदवी शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास थेट द्वितीय वर्षास प्रवेश मिळणार नाही. उदाहरणार्थ, प्रथम वर्ष बी.कॉम., बी.एस्सी. अथवा बी.ए. व्यतिरिक्त इतर शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना बी.ए. प्रथम वर्षास प्रवेश घेता येईल, थेट बी.ए. द्वितीय वर्षास प्रवेश मिळणार नाही.

## ४.३ नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष बी.ए.)

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | १६००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. | ६००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **२२००=००** |

## सरळ (थेट) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष बी.ए.)

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | ३१००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. | ६००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **३७००=००** |

### शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

- ऑनलाईन प्रवेश करताना प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी रु. १,६००/– आणि सरळ (थेट) द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी रु. ३,१००/–इंटरनेट बँकिंग, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईलबँकींग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.

- प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क रु. ६००/– मात्र अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यास–केंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.

- अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## ४.४ कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन–कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोयीने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून बी.ए. पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोयीने आठ वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला देण्यात आली आहे. वर्षअखेरीस होणारी परीक्षा अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास त्याच वेळी देण्याची सक्ती नाही, तसेच वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोयीने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. समजा, आपण प्रथम वर्षाची अंतिम परीक्षा दिली; परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे ४०% गुण) तरी आपणांस द्वितीय वर्षास प्रवेश दिला जाईल. मात्र पहिल्यावर्षाच्या अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा पुढे द्यावी लागेल. ह्या लवचीक पद्धतीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

## ४.५ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी माध्यम विद्यार्थ्याने निवडलेल्या अध्ययनाच्या भाषेचे राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्य–पुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गाचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका निवड केलेल्या

भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## ४.६ मूल्यमापन प्रक्रिया

### अंतर्गत मूल्यमा१पन

- अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न असतील.
- गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत आणि ते सोडवून अभ्यासकेंद्रावर जमा करावेत.

  प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गृहपाठासाठी प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न सोडवावयाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यायचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४0% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (CA) दर्शविण्यात येतील. तसेच हे गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांत मिसळून गुणपत्रिकेत एकत्रितपणे दर्शविण्यात येतील.
- अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

### अंतिम मूल्यमापन१

- प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक वर्षास प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती वर्ष सहा अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४0% गुण मिळविणे अनिवार्य असेल.
- पर्यावरण अभ्यास (EVS 201) या अभ्यासक्रमासाठी ८० गुणांसाठी परीक्षा असेल, २० गुण हे क्षेत्रीय कार्यासाठी असतील.

# ५. तृतीय वर्ष बी. ए.

## ५.१ अभ्यासक्रम

- **तृतीय वर्ष सामान्यस्तर**

**विशेष स्तरावर एकाच विषयाच्या सहा अभ्यासक्रमांची परीक्षा देऊन आपण बी.ए. विशेषस्तर (स्पेशल) अशी पदवी घेऊ शकता किंवा सामान्य स्तरासाठी दोन विषयांतील प्रत्येकी तीन** अभ्यासक्रम निवडून बी.ए. (सामान्यस्तर) अशी पदवी घेऊ शकता. तृतीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विषयांची सूची पुढीलप्रमाणे आहे.

**(१) सामान्यस्तर : विषयवार अभ्यासक्रमांची यादी –**

| *विषय* | *संकेतांक* | *अभ्यासक्रम* |
|---|---|---|
| (१) मराठी | MAR 250 | वाङ्मय प्रकार (काव्य व नाटक) |
| | MAR 251 | मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह |
| | MAR 254 | प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये |
| (2) English | ENG 255 | Indian Writing in English |
| | ENG 257 | Understanding Prose |
| | ENG 259 | Communication Skills in English |
| (३) हिंदी | HIN 260 | कविता : स्वरूप और विवेचन |
| | HIN 262 | हिंदी में नवजागरण |
| | HIN 264 | प्रयोजनमूलक हिंदी |
| (४) मानसशास्त्र | PSY 271 | मी आणि माझे सामाजिक वर्तन |
| | PSY 273 | व्यक्तिमत्त्व विकास |
| | PSY 274 | वैवाहिक समायोजन आणि मार्गदर्शन |
| (५) अर्थशास्त्र | ECO 275 | भारताचा आर्थिक विकास |
| | ECO 276 | सार्वजनिक वित्त व्यवहार |
| | ECO 279 | ग्राहक संरक्षण |
| (६) इतिहास | HIS 280 | प्राचीन भारत : प्रारंभ ते यादवकाळ |
| | HIS 281 | मध्ययुगीन भारत (इ.स. १२०६ ते १८५७) |
| | HIS 285 | विविधतेतून एकता |
| (७) राज्यशास्त्र | POL 286 | राज्यशास्त्राचे स्वरूप |
| | POL 287 | राजकीय संरचना |
| | POL 288 | आधुनिक भारतातील राजकीय वारसा |
| (८) समाजशास्त्र | SOC 291 | पर्यावरण व समाज |
| | SOC 292 | ग्रामीण समाजशास्त्र |
| | SOC 295 | लोकसंख्या शिक्षण |

**द्वितीय वर्षास जे विषय निवडलेले असतील त्यांपैकी** तृतीय वर्षात कोणतेही **दोन विषय** सामान्य स्तरावरील बी.ए. करण्यासाठी निवडावेत. त्यात **एक विषय मराठी, हिंदी, इंग्रजी या मानव्यविद्या गटातील व दुसरा विषय सामाजिकशास्त्राच्या गटातील निवडावा.** प्रत्येक विषयाचे तीन अभ्यासक्रम असतील. त्यानुसार एकूण सहा अभ्यासक्रमांची परीक्षा द्यावी लागेल. एकदा निवडलेले विषय बदलता

येणार नाहीत. माध्यम / विषय बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

**(२) विशेषस्तर : विषयवार अभ्यासक्रमाची यादी –**

| *विषय* | *संकेतांक* | *अभ्यासक्रम* |
|---|---|---|
| मराठी | MAR 250 | वाङ्मय प्रकार (नाटक–कविता) |
| | MAR 251 | मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह |
| | MAR 252 | प्रबोधनपर साहित्य |
| | MAR 253 | बालसाहित्य |
| | MAR 254 | प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये |
| | MAR 305 | लोकवाङ्मय |
| English | ENG 255 | Indian Writing in English |
| | ENG 256 | Understanding Drama |
| | ENG 257 | Understanding Prose |
| | ENG 258 | Understanding Poetry |
| | ENG 259 | Communication Skills in English |
| | ENG 306 | Structure of Modern English |
| हिंदी | HIN 260 | कविता : स्वरूप और विवेचन |
| | HIN 261 | साहित्य और समीक्षा : स्वरूप और विवेचन |
| | HIN 262 | हिंदी में नवजागरण |
| | HIN 263 | हिंदी का भाषा–वैज्ञानिक अध्ययन |
| | HIN 264 | प्रयोजनमूलक हिंदी |
| | HIN 307 | अनुवाद : स्वरूप और विवेचन |
| मानसशास्त्र | PSY 270 | मानवी विनिमय व समायोजन |
| | PSY 271 | मी आणि माझे सामाजिक वर्तन |
| | PSY 272 | मानसिक स्वास्थ्य |
| | PSY 273 | व्यक्तिमत्त्व विकास |
| | PSY 274 | वैवाहिक समायोजन आणि मार्गदर्शन |
| | PSY 308 | प्रायोगिक पद्धती : सांख्यिकी व मानशास्त्रीय प्रयोग |
| अर्थशास्त्र | ECO 275 | भारताचा आर्थिक विकास |
| | ECO 276 | सार्वजनिक वित्त व्यवहार |
| | ECO 277 | आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र |
| | ECO 278 | कृषी उद्योग व सेवाक्षेत्रांचे आर्थिक सिद्धांत |
| | ECO 279 | ग्राहक संरक्षण |
| | ECO 309 | ग्रामीण विकास |
| इतिहास | HIS 280 | प्राचीन भारत : प्रारंभ ते यादव काळ |
| | HIS 281 | मध्ययुगीन भारत (इ.स. १२०६ ते १८५७) |
| | HIS 282 | भारतीय स्त्री जीवनाची वाटचाल |
| | HIS 283 | सार्क देशांचा इतिहास |
| | HIS 285 | विविधतेतून एकता |
| | HIS 310 | आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास |
| राज्यशास्त्र | POL 286 | राज्यशास्त्राचे स्वरूप |
| | POL 287 | राजकीय संरचना |
| | POL 288 | आधुनिक भारतातील राजकीय वारसा |
| | POL 289 | आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण |
| | POL 290 | पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह |
| | POL 311 | लोकप्रशासन |
| समाजशास्त्र | SOC 291 | पर्यावरण व समाज |
| | SOC 292 | ग्रामीण समाजशास्त्र |
| | SOC 293 | समाजशास्त्राचे अभिजात विचारवंत |
| | SOC 294 | औद्योगिक समाजशास्त्र |
| | SOC 295 | लोकसंख्या शिक्षण |
| | SOC 312 | वयोवर्धन प्रक्रिया |

**सूचना :**

(१) **विशेष स्तराकरिता विद्यार्थ्यांनी ज्या विषयाची निवड केली आहे, त्या विषयाचे अभ्यासक्रम त्यांनी द्वितीय वर्षासाठी अभ्यासणे आवश्यक आहे. जो विषय त्यांनी अभ्यासला आहे त्यातील अभ्यासक्रमांचीच निवड तृतीय वर्षाला विशेषस्तर म्हणून करावी.**

(२) बी.ए.साठी मानसशास्त्र विषयाची विशेषस्तरावर निवड केल्यास या विषयाच्या सहा अभ्यासक्रमांपैकी **एका** (PSY 308) **अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके अंतर्भूत असतील.** त्यांची प्रात्यक्षिके अभ्यासकेंद्राच्या **महाविद्यालयातील प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना करावयाची आहेत**. **ज्या अभ्यासकेंद्रांवर अशी प्रयोगशाळा असेल तेथेच मानसशास्त्र विशेषस्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी विषय निवडण्यापूर्वी आपापल्या अभ्यासकेंद्र प्रमुखांकडून याबाबत खात्री करून मगच प्रवेश–अर्जात विषयाची नोंद करावी. एका अभ्यासकेंद्रावर जास्तीत जास्त २० विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल.** पुरेशी विद्यार्थी संख्या झाल्यानंतर केंद्रसंयोजक या विषयासाठी प्रवेश बंद करतील.

## तृतीय वर्ष बी. ए. : अभ्यासक्रम

### मराठी

■ **वाङ्मय प्रकार (काव्य व नाटक) (MAR 250)**

पुस्तक पहिले: कविता
पुस्तक दुसरे : नाटक
पुस्तक तिसरे: नाटक : आकलन आणि आस्वाद

■ **मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह (MAR 251)**

पुस्तक पहिले: महानुभाव व संत वाङ्मय
पुस्तक दुसरे : पंडिती, शाहिरी व बखर वाङ्मय
पुस्तक तिसरे: मध्ययुगीन वाङ्मय प्रवाह : निवडक वेचे

■ **प्रबोधनपर साहित्य (MAR 252)**
पुस्तक पहिले: प्रबोधनपर साहित्य : स्वरूप व संकल्पना
पुस्तक दुसरे : प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय
पुस्तक तिसरे: प्रबोधनपर ललित वाङ्मय

■ **बालसाहित्य (MAR 253)**
पुस्तक पहिले: बालसाहित्य : स्वरूप आणि वाटचाल
पुस्तक दुसरे : बालकथा व बालकादंबरी
पुस्तक तिसरे: बालसाहित्य : कविता, नाटक व चरित्र

■ **प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये (MAR 254)**
पुस्तक पहिले: मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये
पुस्तक दुसरे : दृक्-श्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्ये
पुस्तक तिसरे: लेखनाचे विविध आकृतिबंध

■ **लोकवाङ्मय (MAR 305)**
पुस्तक पहिले: लोकसाहित्य
पुस्तक दुसरे : लोकसाहित्य व आधुनिक साहित्य
पुस्तक तिसरे: लोकसाहित्य : संशोधन पद्धती

## इंग्रजी

■ **Indian Writing in English (ऐच्छिक) (ENG 255)**
Book 1 : Non-Fictional Prose
Book 2 : Indian Poetry in English
Book 3 : Fictional Prose

■ **Understanding Drama (ENG 256)**
Book 1 : Drama : Theory and History
Book 2 : European Drama
Book 3 : Indian Drama

■ **Understanding Prose (ऐच्छिक)(ENG 257)**
Book 1 : History of English Prose
Book 2 : Forms of Prose
Book 3 : Close Textual Reading

■ **Understanding Poetry (ENG 258)**
Book 1 : The Romantic Poetry
Book 2 : The Victorian Poetry
Book 3 : The Modern Poetry

■ **Communication Skills in English (पूरक) (ENG 259)**
Book 1 : Communication Skills in English
Book 2 : Communication Skills in English
Book 3 : Communication Skills in English

■ **Structure of Modern English (ENG 306)**
Book 1 : Phonetics and Phonology of English
Book 2 : Grammar of English Words and Phrases
Book 3 : Sentence Grammar

## हिंदी

■ **कविता : स्वरूप और विवेचन (ऐच्छिक) (HIN 260)**
किताब पहली : कविता की अवधारणा
किताब दूसरी : मध्ययुगीन कविता
किताब तीसरी : आधुनिक कविता

■ **साहित्य और समीक्षा : स्वरूप और विवेचन (HIN 261)**
किताब पहली : साहित्य की अवधारणा
किताब दूसरी : साहित्य के रूप
किताब तीसरी : समीक्षा का स्वरूप

■ **हिंदी में नवजागरण (ऐच्छिक) (HIN 262)**
किताब पहली : मध्यकाल में नवजागरण
किताब दूसरी : उन्नीसवीं सदी में नवजागरण
किताब तीसरी : बीसवीं सदी में नवजागरण

■ **हिंदी भाषा का वैज्ञानिक अध्ययन (HIN 263)**
किताब पहली : हिंदी भाषा का परिचय
किताब दूसरी : हिंदी भाषा का उद्भव और विकास
किताब तीसरी : हिंदी भाषा की संरचना

■ **प्रयोजनमूलक हिंदी (ऐच्छिक) (HIN 264)**
किताब पहली : संचार-माध्यमों में हिंदी
किताब दूसरी : कार्यालयीन और व्यावहारिक हिंदी
किताब तीसरी : पारिभाषिक शब्दावली

■ **अनुवाद : स्वरूप और विवेचन (HIN 307)**
किताब पहली : अनुवाद की अवधारणा
किताब दूसरी : व्यावहारिक अनुवाद
किताब तीसरी : साहित्यिक अनुवाद

## मानसशास्त्र

■ **मानवी विनिमय आणि समायोजन (PSY 270)**
पुस्तक पहिले: संप्रेषण आणि मानवी विनिमय
पुस्तक दुसरे : समायोजनाचे स्वरूप आणि समस्या
पुस्तक तिसरे: परिणामकारक समायोजन आणि वैयक्तिक विकास

■ **मी आणि माझे सामाजिक वर्तन (ऐच्छिक) (PSY 271)**
पुस्तक पहिले: सामाजिक मानसशास्त्र, सामाजीकरण आणि सामाजिक प्रेरणा
पुस्तक दुसरे : भाषा व संप्रेषण, अभिवृत्ती आणि सामाजिक वर्तन
पुस्तक तिसरे: समूह, सामाजिक प्रभाव आणि नेतृत्व

- **मानसिक स्वास्थ्य (PSY 272)**
  पुस्तक पहिले: मनःस्वास्थ्य : स्वरूप आणि परिपोष
  पुस्तक दुसरे : मनःस्वास्थ्य : विकास आणि विकार
  पुस्तक तिसरे: मनःस्वास्थ्याची जपणूक आणि सेवा

- **व्यक्तिमत्त्व विकास (ऐच्छिक) (PSY 273)**
  पुस्तक पहिले: व्यक्तिमत्वाचे स्वरूप, विकासाची प्रक्रिया आणि स्व–संकल्पना
  पुस्तक दुसरे : संप्रेषण कौशल्यांचा आणि प्रभावी आंतरव्यक्तिक संबंधांचा विकास
  पुस्तक तिसरे: व्यक्तिमत्त्व समस्या आणि मानसिक आरोग्य

- **वैवाहिक समायोजन आणि मार्गदर्शन (PSY 274)**
  पुस्तक पहिले: कुटुंब आणि वैवाहिक समायोजन
  पुस्तक दुसरे : वैवाहिक समस्या आणि चांगल्या वैवाहिक संबंधाचे फायदे
  पुस्तक तिसरे: वैवाहिक समस्या : मार्गदर्शन व उपचार

- **सांख्यिकी व मानसशास्त्रीय प्रयोग (PSY 308)**
  पुस्तक पहिले: संशोधन, प्रदत्त संकलन आणि प्रयोग
  पुस्तक दुसरे : मनोमापन व सांख्यिकी
  पुस्तक तिसरे: मानसशास्त्रीय प्रयोग व चाचण्या (कार्यपुस्तिका)

अर्थशास्त्र

- **भारताचा आर्थिक विकास (ऐच्छिक) (ECO 275)**
  पुस्तक पहिले : भारतीय अर्थव्यवस्था आणि भारताची लोकसंख्या
  पुस्तक दुसरे : भारतातील शेती व उद्योग
  पुस्तक तिसरे: भारतीय कामगार, आर्थिक धोरणे आणि नियोजनाचे मूल्यमापन

- **सार्वजनिक वित्तव्यवहार (ऐच्छिक) (ECO 276)**
  पुस्तक पहिले: सार्वजनिक उत्पन्न
  पुस्तक दुसरे : सार्वजनिक खर्च
  पुस्तक तिसरे: राजकोषीय व्यवस्था व अर्थसंकल्पीय धोरण

- **आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र (ECO 277)**
  पुस्तक पहिले: आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत
  पुस्तक दुसरे : आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण
  पुस्तक तिसरे: आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापारविषयक संस्था.

- **कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत (ECO 278)**
  पुस्तक पहिले: कृषी क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत
  पुस्तक दुसरे : उद्योग क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत
  पुस्तक तिसरे: सेवा क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत

- **ग्राहक संरक्षण (ECO 279)**
  पुस्तक पहिले: ग्राहक : संकल्पना व चळवळ
  पुस्तक दुसरे : ग्राहकांच्या समस्या व निराकरण
  पुस्तक तिसरे: ग्राहकांचे अर्थशास्त्र व खरेदीशास्त्र

- **ग्रामीण विकास (ECO 309)**
  पुस्तक पहिले: ग्रामीण भारताच्या समस्या
  पुस्तक दुसरे : ग्रामीण सरकारी संघटन आणि विकासासंबंधी सरकारी दृष्टिकोन
  पुस्तक तिसरे : ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोन

## राज्यशास्त्र

- **राज्यशास्त्राचे स्वरूप (ऐच्छिक) (POL 286)**
  पुस्तक पहिले: व्यक्ती, समाज आणि राज्यसंस्था
  पुस्तक दुसरे : राज्यसंस्थेविषयीच्या भूमिका आणि राजकीय व्यवहार
  पुस्तक तिसरे: पायाभूत राजकीय संकल्पना

- **राजकीय संरचना (ऐच्छिक) (POL 287)**
  पुस्तक पहिले: राज्यघटना व संघराज्यव्यवस्था
  पुस्तक दुसरे : राजकीय पक्ष आणि निवडणूक व्यवस्था
  पुस्तक तिसरे: विधिमंडळ, कार्यकारिणी आणि न्यायमंडळ

- **आधुनिक भारताचा राजकीय वारसा (POL 288)**
  पुस्तक पहिले: भारतीय राजकीय विचारांची पार्श्वभूमी
  पुस्तक दुसरे : स्वातंत्र्यपूर्वकालीन राजकीय विचारप्रवाह
  पुस्तक तिसरे: स्वतंत्र भारतातील राजकीय विचारप्रवाह

- **आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण (POL 289)**
  पुस्तक पहिले: आंतरराष्ट्रीय राजकारण : सिद्धांत आणि स्वरूप
  पुस्तक दुसरे : आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मूलाधार
  पुस्तक तिसरे: आंतरराष्ट्रीय संबंधाची वाटचाल

- **पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह (POL 290)**
  पुस्तक पहिले: अभिजात राजकीय विचारप्रवाह
  पुस्तक दुसरे : आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह – भाग १
  पुस्तक तिसरे: आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह – भाग २

- **लोकप्रशासन (POL 311)**
  पुस्तक पहिले: लोकप्रशासन : स्वरूप व व्याप्ती
  पुस्तक दुसरे : प्रशासकीय यंत्रणा
  पुस्तक तिसरे: स्थानिक प्रशासन : ग्रामीण व नागरी

## इतिहास

- **प्राचीन भारत : प्रारंभ ते यादवकाळ (HIS 280)**
  पुस्तक पहिलेः प्राचीन भारताची सांस्कृतिक ओळख (प्रारंभ ते ख्रिस्तपूर्व ६००)
  पुस्तक दुसरे : प्राचीन भारत : राजकीय स्थित्यंतरे
  पुस्तक तिसरेः प्राचीन भारत : आर्थिक व सामाजिक वाटचाल

- **मध्ययुगीन भारत : (इ.स. १२०६ ते १८५७) (HIS 281)**
  पुस्तक पहिलेः सल्तनत ते विजयनगर (१२०६ ते १५२६)
  पुस्तक दुसरे : मोगल – मराठा कालखंड (१५२६ ते १८१८)
  पुस्तक तिसरेः वसाहतवादाचा पूर्वरंग

- **भारतीय स्त्री–जीवनाची वाटचाल (HIS 282)**
  पुस्तक पहिलेः प्राचीन भारतीय स्त्री–जीवन
  पुस्तक दुसरे : मध्ययुगीन भारतातील स्त्री–जीवन
  पुस्तक तिसरेः आधुनिक भारतातील स्त्री–जीवन

- **सार्क देशांचा इतिहास (HIS 283)**
  पुस्तक पहिलेः सार्क देशांचा परिचय
  पुस्तक दुसरे : वसाहतवाद व सार्क देश
  पुस्तक तिसरेः सार्क स्थापनेनंतरची वाटचाल

- **विविधतेतील एकता (HIS 285)**
  पुस्तक पहिलेः भारताचा सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक जडणघडण
  पुस्तक दुसरे : भारतातील धार्मिक विविधता
  पुस्तक तिसरेः सामाजिक पुनर्बांधणीची दिशा

- **आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (HIS 310)**
  पुस्तक पहिलेः ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र
  पुस्तक दुसरे : महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन
  पुस्तक तिसरेः आंतरराष्ट्रीय आंदोलनातील महाराष्ट्राचा सहभाग

## समाजशास्त्र

- **पर्यावरण व समाज (SOC 291)**
  पुस्तक पहिलेः पर्यावरणविषयक विविध संकल्पना
  पुस्तक दुसरे : जागतिक समस्या
  पुस्तक तिसरेः स्थानिक समस्या

- **ग्रामीण समाजशास्त्र (SOC 292)**
  पुस्तक पहिलेः ग्रामीण समाजशास्त्र : स्वरूप व व्याप्ती
  पुस्तक दुसरे : जातिव्यवस्था व अर्थव्यवस्था
  पुस्तक तिसरेः ग्रामीण राजकारण आणि ग्रामीण संस्कृती

- **समाजशास्त्राचे अभिजात विचारवंत (SOC 293)**
  पुस्तक पहिलेः समाजशास्त्राचा उगम
  पुस्तक दुसरे : कार्ल मार्क्स आणि मॅक्स वेबर
  पुस्तक तिसरेः एमिल दुरखीम

- **औद्योगिक समाजशास्त्र (SOC 294)**
  पुस्तक पहिलेः औद्योगिक समाजशास्त्र : स्वरूप व व्याप्ती
  पुस्तक दुसरे : उद्योगधंदे, नोकरशाही, कामगार व व्यवस्थापन
  पुस्तक तिसरेः औद्योगिक संबंध व कामगार कल्याण

- **लोकसंख्या शिक्षण (SOC 295)**
  पुस्तक पहिलेः लोकसंख्या शिक्षण : ओळख
  पुस्तक दुसरे : कुटुंबस्वास्थ्य शिक्षण
  पुस्तक तिसरेः लोकसंख्या शिक्षण : मूल्यमापन संशोधन

- **वयोवर्धन प्रक्रिया (SOC 312)**
  पुस्तक पहिलेः वयोवर्धन प्रक्रिया : स्वरूप व व्याप्ती
  पुस्तक दुसरे : वृद्धांचे आरोग्य : शारीरिक व मानसिक
  पुस्तक तिसरेः वृद्धापकाल समायोजन आणि ज्येष्ठोपयोगी संस्थांची भूमिका

## ५.२ प्रवेश–पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती.

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

**२. थेट/सरळ तृतीय वर्ष बी.ए. ला प्रवेश मिळणार नाही.**

## ५.३ नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्रम शुल्क (तृतीय वर्ष बी.ए.)

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. १६००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. ८००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.२४००=००१** |

**शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना**

- ऑनलाईन प्रवेश करताना प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी रु. १६००/– इंटरनेट बँकिंग, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईलबँकींग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.
- प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क रु. ८००/– मात्र अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस

केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यासकेंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.

- ❖ अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## ५.४ शिक्षणक्रम कालावधी

जे विद्यार्थी थेट / सरळ द्वितीय वर्ष बी.ए. ला प्रवेश घेतील त्यांच्यासाठी कमाल नोंदणी कालावधी ५ वर्षे इतका राहील.

## ५.५ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी माध्यम विद्यार्थ्याने निवडलेल्या अध्ययनाच्या भाषेचे राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्य-पुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका निवड केलेल्या भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## ५.६ मूल्यमापन प्रक्रिया

### अंतर्गत मूल्यमापन

- ■ अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न असतील.
- ■ गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत आणि ते सोडवून अभ्यासकेंद्रावर जमा करावेत.

  प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गृहपाठासाठी प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न सोडवावयाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यायचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (CA) दर्शविण्यात येतील. तसेच हे गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांत मिसळून गुणपत्रिकेत एकत्रितपणे दर्शविण्यात येतील.
- ■ अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

### अंतिम मूल्यमापन

- ■ प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक वर्षास प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती वर्ष सहा अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.
- ■ **मानसशास्त्र विषयात (विशेषस्तर) प्रयोगांचा अंतर्भाव असल्याने PSY 308 'प्रायोगिक पद्धती' या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र मूल्यमापन पद्धती असेल. ती संबंधित विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**
- ■ **द्वितीय / तृतीय वर्ष बी.ए. अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेच्या गुणांवरच पदवी दिली जाते.**
- ■ **विद्यार्थ्यांना मूल्यमापन व अंतिम परीक्षा अशा दोन्हींत किमान ४०% गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.** अंतर्गत मूल्यमापन म्हणजे गृहपाठ पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्याचा लाभ अंतिम मूल्यमापनासाठी घेता येईल व जे विद्यार्थी अंतर्गत मूल्यमापनातील गृहपाठ पूर्ण करणार नाहीत त्यांचे मूल्यमापन केवळ अंतिम परीक्षेच्या गुणांवरच करण्यात येईल. प्राप्त गुणांचे ८०% महत्त्वप्रमाणानुसार गुण रूपांतरण करून त्यानुसार अंतिम निकाल घोषित करण्यात येईल.
- ■ **जे विद्यार्थी अंतिम परीक्षेत अनुत्तीर्ण होतील त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील परीक्षा या लिंकवर जाऊन पुनर्परिक्षेचा अर्ज (फॉर्म) भरावा. परीक्षा विभागाने पुनर्परीक्षेकरिता निर्धारित केलेले शुल्क विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे.**

# ६. नोंदणी प्रक्रिया

या शिक्षणक्रमाची प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. खालील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे.

(१) माहितीपुस्तिकेचा बारकाईने अभ्यास करावा. आपण शिक्षण-क्रमाच्या प्रवेशास पात्र आहात याची खात्री आणि आपण पात्र असल्याचा पुरावा म्हणून खालील दस्तऐवजांची स्कॅन प्रत मिळवावी.

(अ) जन्मतारखेचा दाखला (वाहन परवाना किंवा पॅनकार्ड किंवा जन्मतारीख असलेले आधारकार्ड किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा पासपोर्ट किंवा इलेक्शन कार्ड).

(आ) पात्रतेच्या परीक्षेचे गुणदानपत्र किंवा प्रमाणपत्र.

(इ) जर पात्रतेसाठी प्रवेश परीक्षा आवश्यक असेल तर सदरची प्रवेश परीक्षा पात्र झाल्याचे प्रमाणपत्र.

(ई) जर आपण मागासवर्गीय उमेदवार असाल तर आपल्या संवर्गासंदर्भातील नियमाप्रमाणे जातीचा दाखला, जात पडताळणी, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, इत्यादी.

(उ) जर आपण अपंगत्व असलेले (उदा. अंधत्व असलेले विद्यार्थी असाल तर आपले अपंगत्व दर्शविणारी कागदपत्रे).

(२) आपणास किमान ७२ डीपीआय या रिझॉल्युशन बरहुकूम वरील सर्व दस्तऐवजांची स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. यासाठी आपण आपल्या मित्रांची किंवा अभ्यासकेंद्राची मदत घेऊ शकता.

(३) आपणाकडे चालू स्थितीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक आणि वैध इ-मेल आयडी असणे गरजेचे आहे. इ-मेल आयडी मिळविण्यासाठी आपण gmail.com, outlook.com rediffmail.com किंवा yahoo.com. यासारख्या संकेतस्थळांवर भेट देऊन विनाशुल्क इ-मेल आयडी मिळवू शकतात. यांचा वापर आपणांस पासवर्ड, प्रवेशाची स्थिती, इत्यादी माहिती मिळविण्यासाठी केला जातो.

(४) नोंदणी प्रक्रियेसाठी इंटरनेट जोडणी असलेली संगणकाची सेवा घ्यावी लागते. जर तुमच्याकडे अशा प्रकारचे संगणक नसतील तर आपण सायबर कॅफे किंवा अभ्यासकेंद्रे किंवा मित्राकडील उपलब्ध संगणकाचा वापर करू शकता.

(५) आपण वर नमूद केल्याप्रमाणे पूर्वतयारी केल्यानंतर ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेकडे वळू शकता. यासाठी आपण विद्यापीठाचे संकेतस्थळ http://ycmou.digitaluniversity.ac येथे क्लिक करा.

(६) जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तर आपणास या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे लागेल. कृपया 'शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका. जरी आपणास एखाद्या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल आणि आपणाकडे अगोदरच १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तरीही 'शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका.

(७) तसेच जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसेल तर होम पेजवरील त्या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे. चुकीचा पर्याय निवडू नये. आपणास संकेतस्थळावरील सूचनेप्रमाणे आपण इ-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, इत्यादी माहिती भरून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा लागेल.

(८) ऑनलाइन पद्धतीने प्रवेश कसे मिळवावे यासंदर्भातील स्क्रिन शॉट असलेली एक पुस्तिका संकेतस्थळावर वेगळ्या पद्धतीने उपलब्ध करून दिलेली आहे. याचा वापर केल्यास आपणास ऑनलाइन अर्ज भरणे सोयीचे जाईल.

(९) आपण सर्व तपशील ऑनलाइन पद्धतीने सादर केल्यानंतर संगणकीय प्रणाली आपणांस स्कॅन केलेली कागदपत्रे सादर करण्यास (अपलोड करण्यास) सूचना करेल. आपण सादर केलेल्या माहितीप्रमाणे आपणांस कोणकोणती कागदपत्रे सादर करावयाची आहेत याचा स्वयंचलित पद्धतीने अभ्यास करून संगणकीय प्रणाली सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील ठरविते.

(१०) सर्व कागदपत्रे अपलोड केल्यानंतर आपण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंग) किंवा रोख पद्धतीने विद्यापीठ शुल्काचा भरणा कराल. ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून भरणा कसा करावयाचा याबाबत एक पुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(११) आपण सादर केलेल्या कागदपत्रांची विद्यापीठ स्तरावरील छाननी झाल्यानंतर आपला प्रवेश निश्चित केला जाईल याची नोंद घ्यावी.

(१४) ऑनलाइन प्रवेश नोंदणी प्रक्रियेसाठी परिशिष्ट क्रमांक १ पहावे.

## ७. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती - ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४५
फॅक्स : २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी, औरंगाबाद - ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक
ग्रँट रोड (प.) मुंबई - ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८६,२३८७४१७७,
२३८२६१३५ फॅक्स : २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस
रविनगर चौक, नागपूर - ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४
फॅक्स : २५५३७२५

**(५) नाशिक** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत,
दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी
नाशिक –४२२ ००२
✆ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

**(६) पुणे** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह,
महापालिका शाळा क्र.५ (मुलांची),
६५४, सदाशिव पेठ हौदासमोर
कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
✆ : (०२०) २४४५७९१४
फॅक्स : २४४९११०७

**(७) कोल्हापूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२ फॅक्स : २६०७०२३

**(८) नांदेड** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २८३०३८, २२९९४०
फॅक्स : २२९९५०

## ८. विशेष सूचना / संपर्कासाठी

### (अ) प्रवेश–अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेश–अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका वाचावी.

०२. प्रवेश–अर्जातील सर्व माहिती पूर्ण भरावी.

०३. विद्यापीठाकडून मिळालेले ओळखपत्र हरविल्यास रु. १५ आणि गुणपत्रक हरविल्यास रु. १००/– प्रति गुणपत्रक याप्रमाणे भरून दुसरी प्रत मिळेल. त्यासाठी शुल्काबरोबर आपले नाव, नोंदणी क्रमांक, वर्ग व अभ्यासकेंद्र ही माहिती कळविणे आवश्यक आहे. ही रक्कम डी.डी.ने पाठवावी. गुणपत्रकासाठी रु. १००/– च्या बॉण्ड पेपरवर स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

### (आ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

०२. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा **'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.**

०३. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

०४. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणे अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०५. विद्यापीठाकडून गृहपाठ अभ्यासकेंद्रामार्फत दिले जातील. ते केवळ अभ्यासाच्या सरावासाठी आहेत. त्यांची उत्तरे लिहून पाहा. काही अडचणी असल्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक–अध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.

०६. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

०७. **<u>अत्यंत महत्त्वाचे</u> : प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदवी प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. नावात बदल असल्यास राजपत्राची प्रत अनिवार्य आहे.**

०८. विद्यार्थ्यांनी प्रवेश, गृहपाठ, परीक्षा, पुनर्परीक्षेबाबात सविस्तर माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

### (इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२. दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५
(दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

## ■ विशेष अडचणींबाबत संपर्क

**१. माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्ज, अभ्यासकेंद्र अडचणी :**

- संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, नाशिक
- नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक
- विभागीय संचालक, संबंधित विभागीय केंद्र

**२. अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :**

- संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
  दूरध्वनी – (०२५३) २२३१४७५

**३. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :**

- नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक
  दूरध्वनी – (०२५३) २२३१४७५
  इ–मेल : *nondani@ycmou.digitaluniversity.ac*

**४. परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी**

- परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
  दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६

**५. अध्ययन–साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, इत्यादी :**

- भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष
  दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

**६. शिष्यवृत्ती**

- शिष्यवृत्ती कक्ष, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी – (०२५३) २२३००५०
  इ–मेल : *scholarship@ycmou.digitaluniversity.ac*
- संबंधित विभागीय केंद्र

## परिशिष्ट १ : नोंदणी प्रक्रिया प्रवाहदर्शिका

ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

### Online Admission Process Flow for Candidate not having 16 Digit P.R.N.

### 16 अंकी P.R.N. नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## Online Admission Process Flow for Candidate who already have 16 Digit P.R.N.

## ज्या विद्यार्थ्यांकडे 16 अंकी PRN आहे त्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



From anywhere personally or with a help of MKCL center, Go to Digital University website. [कोठूनही स्वत: किंवा एमकेसीएल केंद्राच्या मदतीने विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या DU वेब-साईटवर जा.]



For Admission to second/third year, Click on "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" link. [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, स्क्रीनवर दिसणाऱ्या 3 पैकी "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" या लिंकवर क्लिक करा]



Login to your account. Use PRN as user ID and birth date as password. [PRN हा युझर आयडी व जन्म तारीख हा पासवर्ड म्हणून वापरून लॉगइन करा.]



To apply for admission, Click on link, "Admission to Second/Third year". [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, संगणक स्क्रीन admission to Second/Third year या लिंकवर क्लिक करा.]



Student can change & select study center of choice, if S/he desires. [प्रस्तुत स्क्रीन वापरून, इच्छा असल्यास, विद्यार्थी सध्याचे अभ्यास केंद्र बदलू शकतो.]



Select medium of instruction and subjects [अध्ययनाच्या भाषेची व विषयांची निवड येथे करा.]



Select fee category and fee details [फी संबंधी योग्य पर्याय व तपशिलाची निवड येथे करा.]



Select payment mode (online or echalan) [फी बँकेत भरण्याच्या पर्यायाची (डेबिट क्रेडीट कार्ड द्वारे ऑन-लाईन वा इ-चलनाने) निवड येथे करा.]




Pay admission fees online or Print eChalan and Pay Fees in bank next day. Print admission form. [ऑन-लाईन पद्धतीने अथवा चलनाची प्रिंट घेऊन बँकेत दुसऱ्या दिवशी फी भरा. प्रवेश अर्जाची प्रिंट घ्या.]



Everyday YCMOUs finance department will download (both online & echalan payment) MIS file from bank's website and upload it to DU website for auto-reconciliation of financial transactions. [विद्यापीठ दररोज बँकेच्या वेब-साईटवरील ऑनलाईन व इ-चलन आर्थिक देवाण घेवाण MIS फाईल डाऊन-लोड करून DU वेब-साईटवर आर्थिक जुळवणीसाठी उपलोड करील.]



YCMOU will verify fee category, fee paid, documents and approve/reject application online. [मुक्त विद्यापीठ, फी संवर्गाची योग्य निवड, पूर्ण फी भरल्याची खात्री करील व कागदपत्रांची ऑनलाईन तपासणी करून विद्यार्थ्यांचा अर्ज मंजूर/नामंजूर करतील.]




Student will be communicated accordingly by SMS. Student who's application is rejected can make correction either in fee category, pay balance fee online or by e-chalan and/or upload correct document. [प्रवेश-अर्ज मंजूर/नामंजूर झाल्याचा SMS विद्यार्थ्यास जाईल. प्रवेश-अर्ज नामंजूर झालेला विद्यार्थी, ऑन-लाईन पद्धतीने फी संवर्गातील चुक दुरुस्ती करून बँकेत ऑन-लाईन अथवा इ-चलनाने फी भरेल आणि/अथवा योग्य कागदपत्र उपलोड करील.]



Student will get SMS when admission process is completed. S/he will submit application form with echalan copy to study center. Name and addresses of students with payment status approved, will be available online for dispatch of learning material. [प्रवेश-प्रक्रिया पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यास SMS येईल. विद्यार्थी इ-चलनासह प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्रावर देईल. फी भरल्याची खात्री झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अध्ययन साहित्य पाठविण्यासाठी ऑन-लाईन उपलब्ध होईल.]

# परिशिष्ट २ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

## उमेदवार / विद्यार्थी करारनामा

हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'विद्यार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२) त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३) त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ–बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४) तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुविमार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५) त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६) तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७) त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८) त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९) त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०) तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (ycmou.digitaluniversity.ac. OR ycmou.ac.in) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११) तो विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचा अभ्यास अपेक्षित असलेल्या परिश्रम, शिस्त, प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाचा सुयोग्य विद्यार्थ्याप्रमाणे करेल आणि अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यास शोभणार नाही.

## परिशिष्ट २ : Candidate/Student Agreement at the time of Admission

### Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on "ACCEPT" button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process.

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

The candidate undertakes that -

1. He/She has gone through the prospectus and the on-screen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
2. He/She has ensured that he is eligible to the program to which he proposes to take admission and that if it is found otherwise, (that is, if he is found not to be fulfilling the conditions of the eligibility at any time as per the rules mentioned in the prospectus or the on-line narrations) his admission will be summarily cancelled and the fees paid to the university will not be refunded in part or in full.
3. The information about the medium/mode of delivery of the Study Material (for example printed books, e-books, mobile app, audio/video material available on internet or through CD/DVD, etc) has been duly studied by me in the relevant pages of the prospectus and I have no objection to the said mode of delivery. He shall not make any demands on the methods or medium of delivery other than that mentioned in the prospectus.
4. He/She shall make any representations to the YCMOU by logging on as a student in respect of any activities of grievances within a period of thirty days from the date of cause of the grievances or by an email to the university at the designated e-mail address.
5. He/She understands that the University reserves right to make changes in the rules or syllabi or learning material or any other policy matter as a matter of urgency and that such changes in the rules, syllabi or policy matters shall be binding and applicable on him and that he shall not make objections to such changes.
6. He/She shall not change his mobile number as registered with the University during the time of admission to the program.
7. He/She understands that the University shall levy charges on changes in profiles of the student, including the photograph, mobile number, date of birth, etc.
8. He/She understands that in case the University does not receive the fees from the Government (in case of Scholarship or Free-ship candidates), the student may be barred from taking examinations and his results shall not be declared till such time that the fees have been received.
9. He/She understands that any incorrect or incomplete information given by him is liable to cancellation of his admission or withdrawal of degree or diploma awarded to him as and when the university gets to know of such supply of incomplete or incorrect information.
10. He/She shall visit the University's website (ycmou.digitaluniversity.ac and ycmou.ac.in) regularly and undertake necessary steps for academic and administrative purposes as expected from him including downloading of the examination hall ticket and printing the same.
11. He/She shall undertake the studies of the academic program with necessary industry, discipline and honesty and conduct himself with due dignity and shall do nothing which is unbecoming of a student of the YCMOU.

## परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी साहाय्य योजना नियमावली

१. **नाव :** या योजनेचे नाव गरीब विद्यार्थी साहाय्य योजना असे राहील.

२. **व्याप्ती :**

२.१ सदरची गरीब विद्यार्थी साहाय्य योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एका वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

२.२ अंध, अपंग, मूकबधिर, कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण फी, मार्कांची सवलत व्यवस्थापन मंडळाने घेतलेल्या निर्णयान्वये देय राहील.

२.३ आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

३. **पात्रतेचे निकष :**

३.१ गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. १,००,०००/– राहील.

३.२ तहसिलदाराचे मूळ उत्पन्नाचे प्रमाणपत्र मागील वित्तीय वर्षाचे असावे.

३.३ सदर योजनेचा लाभ देताना संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनी मागील शैक्षणिक वर्षाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

३.४ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर सदर विद्यार्थी सर्व विषयांत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३.५ सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीने त्याला ज्या शैक्षणिक वर्षासाठी योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला तो अभ्यासक्रम त्याने / तिने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रातून पूर्ण करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास विद्यापीठाने प्रदान केलेली रक्कम व प्रमाणपत्र विद्यापीठास परत करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी, अभ्यासकेंद्र व विभागीय केंद्र यांची राहील.

३.६ राज्य शासन / केंद्र शासन यांच्याकडे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय नाही.

३.७ रु. ३,०००/– पेक्षा कमी फी असलेल्या शिक्षणक्रमाकरिता ही योजना लागू नाही.

४. **योजनेची गुणांची निकष पद्धत :**

| | | |
|---|---|---|
| ४.१ | विद्यार्थी शहरी भागातील असल्यास | १ गुण |
| ४.२ | विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यास | २ गुण |
| ४.३ | विद्यार्थी अतिदुर्गम भागातील असल्यास | ३ गुण |
| ४.४ | प्रकल्पग्रस्त असल्यास | २ गुण |
| ४.५ | खेळाडू असल्यास (विभागीय / राज्य पातळी) | ४ गुण |
| ४.६ | उत्पन्न मर्यादा रु. ३५०००/– पर्यंत | ३ गुण |
| ४.७ | उत्पन्न मर्यादा रु. ७००००/– पर्यंत | २ गुण |
| ४.८ | उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/– पर्यंत | १ गुण |

५. **अनुज्ञेय रक्कम :** अनुज्ञेय रक्कम या योजनेसाठी निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्त गुणांच्या आधारे व शिक्षणक्रम पातळीनिहाय ठरविलेल्या रकमेच्या आधारे निश्चित केली जाईल.

५.१ पदविका शिक्षणक्रम : रु. ३,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.२ पदवी शिक्षणक्रम : रु. ५,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.३ पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा शिक्षणक्रम : रु. ५,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.४ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम : रु. ७,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.५ गरीब विद्यार्थी साहाय्य निधी योजनेकरिता अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तरतूद आरक्षण विभागातर्फे त्या–त्या शैक्षणिक वर्षात करण्यात येईल.

५.६ अनुज्ञेय रक्कम उदाहरण दाखल तक्ता :

| अ.क्र. | किमान गुण | अनुज्ञेय रकमेचे प्रमाण % | डिप्लोमा | पदवी / पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा | पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. ३000/- | रु. ५000/- | रू. ७000/- |
| १ | 0२ | ३0 | रु. ९00 | रु. १५00 | २१00 |
| २ | ३ ते ५ | ५0 | रु. १५00 | रु. २५00 | ३५00 |
| ३ | ६ च्या पुढे | १00 | रु. ३000 | रु. ५000 | ७000 |

६ गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेअंतर्गत मदत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची पद्धत :

६.१ गरीब विद्यार्थी साहाय्य निधी योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक सहपत्रे जोडून अभ्यासकेंद्राकडे दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

६.२ विद्यार्थ्याने सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्जावर अभ्यासकेंद्र प्रमुख / संयोजक यांचा सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६.३ अर्जातील प्रतिज्ञापत्रावर विद्यार्थ्यांची सही व राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील म्हणजे बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, आय एफ एस सी (IFSC) कोड या बाबी नोंदवणे आवश्यक आहे.

६.४ मागील वर्षी सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षीच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडली आहे काय? ते मागील वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण आहेत का? हे अभ्यासकेंद्र प्रमुखांनी पहावे.

६.५ अभ्यासकेंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज निर्धारित मुदतीत भरून घेऊन विभागीय केंद्रांकडे सादर करावेत.

६.६ अभ्यासकेंद्राने विभागीय केंद्राकडे सादर केलेल्या अर्जाची छाननी वरील निकषांच्या आधारे विभागीय केंद्राने करावी. तसेच विद्यापीठाने दिलेल्या विहित नमुन्यातील माहिती Excel Sheet मध्ये Hard Copy/ Soft Copy तयार करावी.

६.७ शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्याच नियमाप्रमाणे गरीब विद्यार्थी साहाय्य प्रदान करण्यात येईल.

६.८ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नवीन नियमांच्या आधारे गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेची रक्कम प्रदान करण्यात येईल.

६.९ प्रत्येक शैक्षणिक वर्षात दिनांक १५ ऑक्टोबरपर्यंत अभ्यासकेंद्रांनी गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचे अर्ज जमा करावेत व विभागीय केंद्रांनी दिनांक १५ नोव्हेंबरपर्यंत सदरचे अर्ज व तक्त्यातील माहिती उपकुलसचिव, आरक्षण कक्ष यांच्याकडे सादर करावी.

६.१० पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मंजूर केल्याबाबतची अंतिम यादी जानेवारीमध्ये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

## परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली–११० ००२
**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADURSHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

